महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २९० वा | दिनांक : १८/०९/२०२५ | वार : गुरूवार

## बीड अहिल्यानगर रेल्वे गोपीनाथ मुंडेंना अर्पण - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**बीड :** अनेक वर्षांची प्रतीक्षा, तीन पिढ्यांचे स्वप्न आणि अथक प्रयत्नांनंतर अखेर आज मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या मुहूर्तावर बीडच्या भूमीवर रेल्वे धावली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी रेल्वेला हिरवा झेंडा दाखवला. बीडमध्ये सुरू झालेली ही रेल्वे गोपीनाथ मुंडेंना अर्पण करतो असे वक्तव्य राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी बोलताना केले.

बीड ते अहिल्यानगर रेल्वेमार्गावर पहिली गाडी धावल्यामुळे बीड जिल्ह्याचा रेल्वे नकाशावर समावेश झाला आहे. या सोहळ्याला खासदार बजरंग सोनवणे आणि जिल्ह्यातील सर्व आमदार उपस्थित होते. या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी बीडकरांनी मोठ्या संख्येने रेल्वे स्थानकावर गर्दी केली होती.

यावेळी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आज बीडच्या जनतेच्या स्वप्नपूर्तीचा योग आहे. केशरकाकू क्षीरसागर, गोपीनाथराव मुंडे यांनी रेल्वेचे स्वप्न बघितले. पितृपक्षामध्ये आपल्या पितरांना काहीतरी अर्पण करायचे असते, आम्ही गोपीनाथराव मुंडे यांना ही रेल्वे अर्पण करत आहोत. रेल्वे संघर्ष समितीचे देखील मी अभिनंदन करतो. या रेल्वेसाठी आपण सातत्याने पाठपुरावा केला आहे. बीडमध्ये रेल्वे नव्हे तर विकासाची वाहिनी पोहोचली.

रेल्वे प्रकल्पात जमीन अधिग्रहण अवघड काम होते, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. सगळ्या प्रकल्पांमध्ये ५० टक्के सहभाग राज्य घेईल असे पत्र आम्ही केंद्र सरकारला दिले. या आधीच्या सरकारने मराठवाड्याच्या रेल्वेसाठी फक्त ४०० कोटी रुपये दिले होते. पण गेल्या १० वर्षांत मराठवाड्यासाठी २१ हजार कोटी रुपये दिल्याचे ते म्हणाले.

मराठवाड्याच्या पुढच्या पीढीला दुष्काळ बघू देणार नाही. कोल्हापूर-सांगलीमध्ये जो पूर येतो ते पाणी उजनीला आणणार आणि तिथून ते पाणी मराठवाड्यात आणणार. वेगवेगळ्या माध्यमातून मराठवाड्यातील दुष्काळ संपवणार. त्यासंबंधी हे सरकार काम करत आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

दरम्यान, गेल्या ३०-३५ वर्षांपासून बीड जिल्ह्यात रेल्वे यावी, ही येथील जनतेची मागणी होती. दळणवळणाचे एक महत्त्वाचे साधन म्हणून रेल्वेचे महत्त्व सर्वांनाच ठाऊक आहे. बीडकरांचे हे स्वप्न दिवंगत नेत्या केशरकाकू क्षीरसागर यांनी पहिल्यांदा पाहिले आणि त्याची मागणी केली होती. त्यानंतर, दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांनीही त्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला.

आज या स्वप्नाची पूर्तता झाल्याचा आनंद बीडकरांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून नागरिक नवीन रेल्वे पाहण्यासाठी आले होते. अनेकांनी रेल्वेसोबत सेल्फी घेतले, फोटो काढले आणि हा अविस्मरणीय क्षण कॅमेऱ्यात कैद केला.

## मराठा समाजाचे अधिवेशन राजधानीत घेण्याची तारीख लवकरच जाहीर करणार - मनोज जरांगे



**धाराशिव :** मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबई येथील आझाद मैदानावर उपोषण केले होते. त्यानंतर राज्य सरकारने मनोज जरांगेंच्या ८ मागण्यांपैकी ६ मागण्या मान्य करत हैदराबाद गॅझेटनुसार कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी जीआर काढला. हा मराठा समाजासाठी मोठा विजय मानला जात आहे. तसेच राज्यात लवकरच सातारा गॅझेट देखील लागू होण्याची शक्यता आहे. आता मनोज जरांगे यांनी राजधानी दिल्लीत जाणार असल्याची घोषणा केली आहे.

मनोज जरांगे यांनी चलो दिल्लीचा नारा दिला असून, मराठ्यांचे वादळ दिल्लीत धडकणार आहे. देशभरातील मराठा समाजाचे दिल्लीत अधिवेशन घेणार आहेत. लवकरच या अधिवेशनाची तारीख जाहीर करण्यात येणार आहे. हैदराबाद गॅझेट, सातारा गॅझेटच्या अंमलबजावणी नंतर दिल्लीमध्ये मराठा समाजाचे अधिवेशन होणार आहे. धाराशिवमध्ये हैदराबाद गॅझेट लागू करण्यासंदर्भात झालेल्या बैठकीमध्ये मनोज जरांगे पाटील यांनी ही घोषणा केली आहे.

दरम्यान, मराठा आरक्षणासाठी मुंबईत मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला मोठे यश आले आहे. लाखो मराठा बांधवांनी या आंदोलनात सहभाग घेतला होता. सरकारने जरांगे पाटील यांच्या काही मागण्या मान्य केल्या असून, उर्वरित मागण्यांसाठी वेळ मागितला आहे. मराठा समाजाची प्रमुख मागणी असलेल्या 'हैदराबाद गॅझेट' लागू करण्याचा जीआर सरकारने काढला आहे. यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी राजधानी दिल्लीत मराठा समाजाचे अधिवेशन घेण्याची मोठी घोषणा केली आहे.

हैदराबाद गॅझेट लागू करण्याच्या सरकारच्या निर्णयामुळे मराठा समाजाला आरक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असतानाच, ओबीसी समाजाने मात्र आक्रमक पवित्रा घेतला आहे. या जीआरला विरोध करत, ओबीसी समाजाला त्यांच्या कोट्यातून आरक्षण नको अशी भूमिका त्यांनी घेतली आहे. दुसरीकडे, याच गॅझेटचा आधार घेत बंजारा समाज आणि आदिवासी समाजामध्येही संघर्ष सुरू झाला आहे. बंजारा समाजाची एसटी प्रवर्गात समावेश करण्याची मागणी आहे, ज्यामुळे आरक्षणाच्या मुद्यावरून राज्यात विविध समाजगटांमध्ये तणाव वाढत आहे.

## कुणबी प्रमाणपत्राच्या वाटपास सुरुवात : मंत्री छगन भुजबळांचा आक्षेप

**पुणे :** राज्य सरकारने आज मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या निमित्ताने मराठवाड्यातील काही जिल्ह्यांतील मराठा उमेदवारांना कुणबी प्रमाणपत्राचे वाटप केले. पण आता मंत्री तथा ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी या प्रमाणपत्रांवर शंका व्यक्त केली आहे. आज देण्यात आलेली कुणबी प्रमाणपत्र योग्य आहेत का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला होता. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न विचारण्यात आला असता त्यांनी यावर स्पष्टीकरण दिले आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, पहिली गोष्ट अशी आहे की आम्ही जे जीआर काढले आहेत त्या जीआर प्रमाणे जे पात्र आहेत त्यांना दाखले मिळतील. यातील किती लोकांना कुणबी प्रमाणपत्राचे दाखले मिळाले याची आकडेवारी माझ्याकडे नाही. पण कुठूनही मिळत नाही अशी तक्रार आलेली नाही. त्यामुळे त्याची जे काही योग्य कागदपत्रांची पूर्तता आहे ती पूर्तता, त्यानंतर ज्या दोन समित्या तयार केल्या आहेत त्यांचा अहवाल याच्या आधारावर मिळेल.

मंत्री छगन भुजबळ यांनी कुणबी प्रमाणपत्रावर आक्षेप घेतला आहे. यावर देवेंद्र फडणवीस म्हणाले, भुजबळ साहेब यांनी जे म्हटले आहे त्या संदर्भात या पूर्वीच मी स्पष्ट केले आहे खाडाखोड चालणार नाही. ज्यांच्याकडे दाखले आहेत त्यांच्याच नातेवाईकांना दाखले मिळतील, आपला कायदा आहे. जर कोणाला एखाद्याला मिळालेल्या दाखल्यावर आक्षेप असेल तर तो आक्षेप घेऊ शकतो. त्यामुळे भुजबळ साहेबांच्या जर कुठे नजरेस आले असेल तर निश्चितपणे दखल घेऊन त्यासंदर्भात तक्रार दाखल केली तर त्यावर उचित कारवाई केली जाईल.

मुंबई येथे मीनाताई ठाकरे यांच्या पुतळ्यावर रंग टाकण्यात आला होता. त्यानंतर शिवसेना आक्रमक झाली आहे. यावर प्रश्न विचारण्यात आला असता देवेंद्र फडणवीस म्हणाले, अशा प्रकारची घटना ही निषेधार्य आहे. ज्या कुठल्या समाजकंटकाने ही घटना केली आहे त्याला पोलिस शोधून काढतील आणि कारवाई करतील. यापेक्षा जास्त याला राजकीय रंग देणे हे मला योग्य वाटत नाही.

सध्या आलमाटी धरणाच्या उंचीवरून वाद सुरू आहेत. यावर बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्राचा आलमाटीची ऊंची वाढवण्यासाठी विरोध आहे. या संदर्भात आवश्यकता पडली तर महाराष्ट्र सर्वोच्च न्यायालयात जाईल आणि कर्नाटक राज्याच्या विरोधात पीटिशन करेल, असे फडणवीस यांनी म्हटले आहे.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने महसूल विभागाच्या वतीने सेवा पंधरवड्याच्या अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान राबवण्यात येत आहे. यात वेगवेगळ्या प्रकारच्या १० महत्त्वाच्या योजना राबवण्यात येत आहेत. पाणंद रस्त्यांचे मॅपिंग असेल किंवा लोक अदालतीच्या माध्यमातून प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे असेल, जे वाद आहेत ते वाद संपवण्याच्या गोष्टी या माध्यमातून करण्यात येणार आहेत, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १८ सप्टेंबर २०२५

## मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त उपसरपंच मनेश लक्ष्मण गाजरे यांच्या हस्ते ध्वजारोहण






**दौलताबाद (जावेद अहमद) :** ग्रामपंचायत माळीवाडा येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त उपसरपंच मनेश लक्ष्मण गाजरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले त्यानंतर मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान शुभारंभ याचे थेट प्रक्षेपण ग्रामसभेमध्ये दाखवण्यात आले यावेळी सरपंच ज्योती मुळे, ग्रामपंचायत सदस्य धम्मपाल गायकवाड , कमलबाई अस्वार, प्रवीण बर्डे , अनिता हेकडे, कडू कीर्तीकर, ग्रामपंचायत अधिकारी ए. सी.पटेल , पोलीस पाटील प्रमोद साठे, भीमराज बर्डे, सोमीनाथ भगत, एकनाथ शिरसाट ,अंगणवाडी सेविका ,मदतनीस, आशा सेविका ,ग्रामपंचायत कर्मचारी तसेच प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ. अंबादास आरगडे यांच्या भारतीय संविधान आणि प्रशासन व कार्यालय प्रशासन या दोन ग्रंथाचे प्रकाशन



**छत्रपती संभाजीनगर :** देवगिरी महाविद्यालयातील लोकप्रशासन विभागात कार्यरत सहाय्यक प्राध्यापक डॉ. अंबादास आरगडे याच्या भारतीय संविधान आणि प्रशासन व कार्यालय प्रशासन या दोन ग्रंथाचे प्रकाशन मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे आमदार तथा मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सरचिटणीस मा. सतीशभाऊ चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. अंबादास आरगडे हे मागील पंधरा वर्षापासून देवगिरी महाविद्यालयात अध्यापनाचे कार्य करत असून त्यांचे यापूर्वीही १२ ग्रंथ प्रकाशित झालेले आहेत. त्यांनी राष्ट्रीय, राज्यस्तरीय अशा विविध ९९ चर्चासत्रे आणि परिषदेत सक्रिय सहभाग घेतलेला असून त्याचे ८० संशोधन लेख प्रकाशित झालेले आहेत. याबरोबरच त्यांना विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे. "मराठवाड्याच्या शैक्षणिक विकासात मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाची भूमिका" या विषयावर त्यांनी संशोधन कार्य पूर्ण केलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची पीएच. डी. ही त्याना प्रदान करण्यात आली आहे. या ग्रंथ प्रकाशन प्रसंगी देवगिरी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. गणेश मोहिते, डॉ. ज्ञानेश्वर जिगे, डॉ. जिजा शिंदे उपस्थित होते.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बेरडवाडी येथे मराठवाडा मुक्ती दिन साजरा




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बेरडवाडी येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त ध्वजारोहणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक वाकळे सर यांनी मांडले. विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करून मराठवाडा मुक्ती संग्रामातील हुतात्म्यांच्या कार्याचे स्मरण केले. या कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कांतराव मंडले, उपाध्यक्ष रंजित भोकले, पोलीस पाटील काशिनाथ वासुदेव, शिवशंकर मंडले, रायाप्पा शिवपाटील, रंगुबाई वासुदेव, सपना मंडले, भाग्यश्री वासुदेव, पूजा मंडले यांसह गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहशिक्षक श्री. राठोड, श्री. सोमवंशी, श्री. कांबळे, श्रीमती कांबळे मॅडम, तसेच जमादार मॅडम आणि राम मंडले यांनी परिश्रम घेतले. मराठवाडा मुक्तीसाठी बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांना अभिवादन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात हैदराबाद मुक्ती संग्राम दिन साजरा



**जालना :** हैदराबाद मुक्ती संग्राम दिनानिमित्त बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयामध्ये प्राचार्य डॉ. कविता प्राशर यांनी राष्ट्रध्वजारोहण केले. डॉ. मोहिनी रायबागकर यांच्या संचाने यावेळी महाराष्ट्र गीत गायन केले. यात्रसंगी अंबड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या संपन्न झालेल्या डिस्ट्रिक्ट युथ फेस्टिवलमध्ये महाविद्यालयास पारितोषिके मिळवून देणाऱ्या सहभागी प्राध्यापकांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बी. बी. सले यांनी केले. यावेळी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि राष्ट्रीय छात्र सेना आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी तसेच वस्तीगृहातील विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १८ सप्टेंबर २०२५

## कालिकादेवी विद्यालयात, प्राचार्य केशव भांगे यांच्या हस्ते ध्वजारोहण



**शिरूर कासार :** कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात,'मराठवाडा मुक्ती संग्राम दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यालयाचे,प्राचार्य केशव भांगे साहेब, यांच्या हस्ते,'स्वामी रामानंद तीर्थ' व 'सरदार वल्लभभाई पटेल' यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून राष्ट्रीय तिरंगा ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले,व सामूहिक राष्ट्रगीत तसेच महाराष्ट्र गीत घेण्यात आले. यावेळी शिरूर (का.) नगरपंचायतचे नगराध्यक्ष मा. रोहिदास पाटील गाडेकर, उपनगराध्यक्ष प्रकाशजी देसरडा, जेष्ठ नगरसेवक मा.अर्जूनदादा गाडेकर पाटील,ज्येष्ठ नेते बाबुरावजी झिरपे, मा.डॉ. रमणलालजी बडजाते,नगरसेवक डॉ.भगवानराव सानप,मा. दादासाहेब हरिदास,नगरसेवक तथा सभापती प्रतिनिधी प्रा.अक्षय रणखांब,गटनेते मा.गणेश भांडेकर, बांधकाम सभापती मा.अरूण भालेराव,मा.भीमराव गायकवाड,मा.अमोलजी चव्हाण,मा.दत्ता पाटील गाडेकर, नगरसेवक मा.सावता कातखडे अकाउंटंट मा.खोडवे साहेब, अँड.ढाकणे साहेब,इंजि. दुधाळ साहेब,प्राचार्य डॉ.विश्वास कंधारे साहेब,पत्रकार राम गाडेकर, पत्रकार राज कातखडे,उपप्राचार्य डॉ.संजय तुपे, उपप्राचार्य प्रा. बसवेश्वर देशमाने, पर्यवेक्षक जनार्दन काळे,प्रा.महारुद्र डोंगरे,मा. माऊली पानसंबळ, मा.आनंद जावळे, प्रा.संजय काकडे, व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व कनिष्ठ प्राध्यापक, माध्यमिक शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी,व विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## जि. प. प्राथमिक शाळेत मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन मोठ्या उत्साहाने साजरा



**रेल (कृष्णा शिंदे) :** जि प प्राथमीक शाळा रेल येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आला ध्वजारोहण प्रसंगी मुख्याध्यापक प्रवीण शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला यावेळी रेल व कणकावती नगर ग्रुप ग्रामपंचायतचे सरपंच रंजना राठोड व धनसिंग राठोड संदीप थेटे शालेय व्यवस्थापन समिती सदस्य बाबासाहेब थेटे ग्रामसेविका पडोळ ग्रामपंचायत लिपिक विजय सातदिवे सहशिक्षिका वैशाली बोरसे विक्रम गदळे अंगणवाडी सेविका थेटे ताई बोडके ताई आदी उपस्थित होते

## मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त केसरजवळगा शाळेत अभिवादन कार्यक्रम




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** पीएम श्री जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा केसरजवळगा येथे १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिन मोठ्या उत्साहात व देशभक्तिपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. संदीप पाटील होते. उपाध्यक्ष म्हणून श्री. अजिज शेख यांनी भूमिका बजावली. या प्रसंगी मा. सरपंच श्रीमती पूजा पटवारी, उपसरपंच जयपालसिंग राजपूत, माजी सैनिक बलभीम जाधव, माजी सरपंच अमोल पटवारी, तंटामुक्ती अध्यक्ष शिवशंकर कणमुसे, उपाध्यक्ष बिरबलसिंग राजपूत तसेच बालाजी डिगोळे व इंद्रजीत लोखंडे यांची मान्यवर उपस्थिती लाभली.शाळेतील सहशिक्षक बालाजी भोसले सर, संजय भोसले सर, सुनील राठोड सर यांच्यासह युवा प्रशिक्षणार्थी वैभव पाटील यांनी परिश्रम केला. गावातील पालक, अंगणवाडी कार्यकर्त्या, मदतनीस, आशा कार्यकर्त्या, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालाजी भोसले सर यांनी प्रभावीपणे केले, तर आभार प्रदर्शन सुनील राठोड सर यांनी मानले.मराठवाडा मुक्तीसाठी बलिदान दिलेल्या अमर शहीदांना अभिवादन करून कार्यक्रमाची सांगता झाली.

## बाबुराव माणिकराव पाटील औराळकर माध्यमिक विद्यालय मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन उत्साहात साजरा



**कळंकी (कृष्णा शिंदे) :** आज बाबुराव माणिकराव पाटील औराळकर माध्यमिक विद्यालय कळंकीत उत्साहात साजरा - मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला. स्वातंत्र्यसंग्रामातील श्री सरदार वल्लभभाई पटेल स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात. आले प्रसंगी कळंकी गावात प्रभातफेरी काढण्यात आली. प्रथम ग्रामपंचायत कळंकी येथील ध्वजारोहन करण्यात आले. विद्यालयाचे शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक श्री मुक्तानंद गोस्वामी, यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी शिस्तीत सामुहिक कवायत सादर केली. या प्रसंगी शाळेचे शिक्षक श्री गणेश दारवंटे, श्री नानासोहब निंभोरे,रविंद्र थोरात,संजय वारे बळीराम,राठोड शशिन जाधव .शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, प्रतिष्ठीत नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १८ सप्टेंबर २०२५


## जगण्याइतकेच मरणालाही सुंदर करते कविता - प्रा. वा. ना. आंधळे



**वाघोदा :** मानवी मन आणि मानवी जीवन कवितेनेच समृद्ध होत आले असून ती ठायी ठायी प्रेरणेचा स्त्रोत म्हणूनच कामी आली आहे.संस्कार आणि संस्कृतीची जननी असल्याचे स्पष्ट करतांना संत साहित्यापासून तर खान्देश कन्या कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या कवितांचे समर्पक संदर्भ देत विद्यार्थी वृंदास मंत्रमुग्ध केले.काल दि.१६ सप्टेंबर २०२५ रोजी प्रकाश विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय वाघोदा ता.रावेर या संस्थेच्या हिरक महोत्सवानिमित्त आयोजित व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प गुंफतांना कवी प्रा.वा. ना.आंधळे यांनी काव्यमहतीचे सूतोवाच आपल्या व्याख्यानातून केले. समारंभाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मा. पी.टी. महाजन सर हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे चेअरमन दादासाहेब डी. के.महाजन,उपाध्यक्ष श्री.श्रावण सीताराम महाजन,सचिव श्री.किशोर जगन्नाथ पाटील,सहसचिव श्री.पी.एल. महाजन,मुख्याध्यापक श्री.व्ही.एस.महाजन,पर्यवेक्षक आर.पी.महाजन श्री.राजेश बडगुजर सर व श्री.लक्ष्मीकांत घुगे सर यांची उपस्थिती व्यासपीठावर होती.प्रास्ताविक श्री.राजेश बडगुजर सरांनी केले तर वक्त्यांचा परिचय श्री.जे.आर.पाटील सर यांनी करून दिला. प्रा.आंधळे आपल्या व्याख्यानात पुढे म्हणाले, जगणं कवितेने सुंदर केलं आहेच मरणाऱ्या व्यक्तीचं कौतुक करतांना आमच्या ग्रामीण भागात बायका प्रेताभोवती गाण्यातूनच रडतात.मानवी जन्मापासून तर मानवी मरणापर्यंत साथसोबत करते ती कविता.हे सांगतांना अनेक कवितांचे दाखले व प्रसंग त्यांनी विद्यार्थ्यांपुढे ठेवले.प्रा.आंधळे लिखित पप्पा माझ्या आईला बोलू नका या कवितेच्या सादरीकरणावेळी अनेकांचे डोळे पाणावले. कार्यक्रमाचे सुसूत्र संचलन श्री.यू.जी.महाजन सर यांनी तर आभार प्रदर्शन सौ.भावना पाटील मॅडम यांनी केले.व्याख्याना स विद्यार्थी,शिक्षक व संस्थेच्या संचालक मंडळाची उपस्थिती लाभली.

## कार अपघातात एक जखमी




**दौलताबाद (जावेद अहमद) :** धुळे - सोलापूर हायवेवर हॉटेल ७/१२ जवळील पुलावर आसेगाव येथे रस्त्यावरील खड्ड्याचा अंदाज न आल्याने दोन चारचाकी वाहनांचा अपघात झाला. MH.20.FG.2607 व MH.23.BH.4061 हया जात असताना दि १६ मंगळवारी रात्री आठ वाजता अपघात झालायात भगवान सोनवणे, वय-५०, रा.वाळूज महानगर, ता,जि.छत्रपती संभाजीनगर. हे जखमी झाले होते त्याला उपचारासाठी नरेंद्र चार्य रुग्णवाहिकेत घाटी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहेया रस्त्यावर अपघाताची मालिका सुरुच आहे रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले असल्याने रोजच अपघात होत आहे या अपघातानंतर दि १६ मंगळवारी नऊ वाजता रात्री हॉटेल सृष्टी जवळ एक दुचाकी घसरून अपघात झाला होता रुग्णवाहिकेला या अपघाताची माहिती मिळताच घटनास्थळी गेले होते पण दुचाकी स्वार तिथून निघून गेला होतात्याच मार्गावर दि १६ मंगळवारी रात्री दहा वाजता फतीयाबाद गावाच्या पुढे नायरा पेट्रोल पंप जवळ दोन दुचाकी समोरासमोर अपघात झाला आहेदुचाकी क्र MH17 CY7240 व MH22 GU 1939 यांचे समोरासमोर अपघात झाला यात शिवाजी पवार वय २५ राहणार रामपुरी छत्रपती संभाजी नगर ,जयंत मंडल वय ३०,महादिप मंडल वय २७ वर्ष राहणार पश्चिम बंगाल राज्य हल्ली मुकाम फतीयाबाद तालुका गंगापूर हे जखमी झाले होतेत्यांना नरेंद्र चार्य रुग्णवाहिकेत घाटी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहेअपघाताची मालिका सुरूच आहे

## आदिवासी ठाकर समाजातील पालकांनी ग्रामपंचायत कार्यालय निरगुडी बु,खु मध्ये जन्म नोंदीचे ७८ अर्ज केले दाखल



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** खुलताबाद तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय निरगुडी बुद्रुक ठाकरवाडीतील ९० ते ९५ टक्के आदिवासी गाव असलेल्या ठाकरवाडी भिलवाडीतील दोनशेच्या वर मुलांची जन्म नोंद ग्रामपंचायत मध्ये आढळून आली नसल्यामुळे पालकांनी उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड येथे धाव घेऊन जन्म नोंदी करिता आवश्यक कागदपत्रांची माहिती घेतली जन्म प्रमाणपत्र आधार कार्डसाठी आवश्यक असल्यामुळे शाळेत युडायस प्लस,ऑनलाइन हजेरी करिता शासनाने अनिवार्य केले आहे तरी या विद्यार्थ्यांचे जन्म प्रमाणपत्र लवकर न भेटल्यास जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ठाकरवाडी या शाळेतील दोन शिक्षक पदे उडणार असल्याचे समोर आले आहे.जिल्हा आरोग्य अधिकारी जा.क्र/जिपछसं/आरोग्य/नानोप/१८२/२०२५ कार्यालय आरोग्य विभाग जिल्हा परिषद छत्रपती संभाजी नगर दिनांक १४/०१/२०२५ जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ व महाराष्ट्र जन्म आणी मृत्यु नोंदणी नियम २००० मा.उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड यांच्या आवश्यक कागदपत्रानुसार कागदपत्रे जोडून ग्रामपंचायत कार्यालयात अर्ज जमा करण्यासाठी नेले परंतु ग्रामसेविका भारती पाटील यांनी पालकांना अर्ज जमा करण्यास नकार दिल्यामुळे पालकांनी पंचायत समिती खुलताबाद येथे धाव घेतली व तेथील कृषी विस्तार अधिकारी यांनी ग्रामसेविका भारती पाटील यांना अर्ज जमा करून घेण्यास सांगितले आणि आज दिनांक १७ सप्टेंबर २०२५ रोजी आदिवासी ठाकर समाजातील पालकांनी ग्रामपंचायत कार्यालय निरगुडी बुद्रुक मध्ये जन्म नोंदीचे ७८ अर्ज /फाईल दाखल केले दाखल करते वेळेस ग्रामसेविका भारतीय पाटील यांनी ओ.सी पोच पावती देण्यास नकार दिल्यामुळे पालक व ग्रामसेविकांत बाचाबाची झाली व नंतर दाखल करून घेतल्या अर्जाला प्रति अर्ज ५८० रुपये खर्च झाला आहे तर ७८ अर्ज ला एकूण खर्च ४५ हजार २४० रुपये इतका झाला आहे हे सर्व पालक मक्का च्या मुरघास कुटीच्या कामावर जाऊन पैसे कमावल्याचे पालकांनी सांगितले.

## विश्वकर्मा विद्यामंदिर शाळेत मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन साजरा




**छत्रपती संभाजीनगर :** विश्वकर्मा विद्यामंदिर शाळेत मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ध्वजारोहण साक्षी रोजेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणातून मराठवाडा मुक्तीसंग्राम लढ्याची माहिती दिली.या कार्यक्रमाला प्रदिप भाले,पंडित शिंदे,आवेज शेख, रमेश जोशी, संजय पगारे,नृसरत सय्यद,अजमेरी शेख,नाजेरा शेख, शितल मुरकुटे राज म्हात्रे, गोपाल उगले,भरत गायकवाड, शहाबाज शेख, अदिती अरक, मयुरी काळे यांची उपस्थिती होती.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १८ सप्टेंबर २०२५


## महिला महाविद्यालयात मराठवाडा मुक्तीसंग्राम दिवस साजरा




**छत्रपती संभाजीनगर** : डॉ. सौ.इं.भा.पाठक महिला महाविद्यालय आणि माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आज १७ सप्टेंबर 'मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी डॉ.सौ.इं.भा.पाठक महिला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सुनिता बाजपाई, माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सी.एम.राव, उपप्राचार्य डॉ.अपर्णा कोतापल्ले, महिला महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख डॉ. सुषमा देशपांडे, डॉ. पराग चौधरी,डॉ.दिलीप दोडके, डॉ. मनिषा वाघमारे, प्रा. सचिन देशमुख उपस्थित होते.याप्रसंगी इतिहास विभाग प्रमुख डॉ.सुषमा देशपांडे यांनी मराठवाडा मुक्तिसंग्रामाचे महत्व सांगतांना या मुक्तिसंग्रामात मराठवाड्यातील प्रत्येकाने हिरीरीने सहभागी होऊन हा लढा यशस्वी केला. यात स्त्रीयांचाही तेवढ्याच मोठ्या प्रमाणात सहभाग होता हे सांगतांना त्यांनी दगडाबाई शेळके यांच्या पराक्रमाची गाथा सांगितली. ती ऐकून सर्व उपस्थित भारावून गेले.यावेळी सौ.इं.भा.पाठक महिला महाविद्यालयातील इतिहास विभागाद्वारे १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त ऑनलाईन प्रश्न मंजूषा स्पर्धा आयोजित करण्यात आली. इतिहास विभाग प्रमुख डॉ. सुषमा देशपांडे यांनी बी.ए.,बी.कॉम,बीसीए प्रथम वर्षासाठी(IKS - मराठवाडा मुक्तिसंग्राम) याविषयावर आधारित आपला व्हिडिओ प्रसारीत केला.डॉ. अपर्णा कोतापल्ले यांनी आपल्या शुभेच्छा संदेशातून मुक्तिसंग्रामाच्या लढ्यातून सर्व विद्यार्थ्यांनी प्रेरणा घेऊन आपल्या देशसेवेसाठी आपण सदैव तत्पर असावे असे सांगितले. त्यांच्या शुभेच्छा संदेशाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## ज्ञानेश्वर विद्यालय बेगमपुरा येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा



**बेगमपुरा** : विवेकानंद शिक्षण संस्था संचलित ज्ञानेश्वर विद्यालय,बेगमपुरा येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहणाने झाली. ध्वजारोहणाचा मान विद्यालयाच्या मुख्याध्यापिका डॉ. संध्या मोरे यांना लाभला. यावेळी पर्यवेक्षक श्री. संभाजी तांगडे सर तसेच ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती मंगल पवार उपस्थित होत्या.मराठवाडा मुक्ती संग्राम दिनासोबतच हिंदी दिनानिमित्त आयोजित विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले.कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषण मुख्याध्यापिका डॉ.संध्या मोरे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. भरत झोडपे व श्रीमती मंगला सुलताने यांनी केले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## श्रीकृष्ण महाविद्यालयात मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन साजरा, कलावंताचा केला हृदय सत्कार



**गुंजोटी** : येथे श्रीकृष्ण शिक्षण संस्थेच्या श्रीकृष्ण वरिष्ठ महाविद्यालयात संस्थेचे संचालक डॉ.सागर पतंगे यांच्या हस्ते आणि सचिव डॉ.दामोदर पतंगे,उपाध्यक्ष प्रभाकर तात्या हिरवे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गुलाब राठोड यांच्या उपस्थितीत महाविद्यालयाच्या प्रांगणात राष्ट्रीय ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.याप्रसंगी संस्थेचे सर्व पदाधिकारी, गावातील प्रतिष्ठित नागरिक,प्राध्यापक,प्राध्यापकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.ध्वजारोहण करून राष्ट्रगीत झाल्यानंतर ७७व्या मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या कार्यक्रमाचे औचित्य साधून नुकत्याच अणदूर येथे पार पडलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या युवक महोत्सवात श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या युवकांनी विविध कलाप्रकारात आपल्या कलाविष्कारांनी जे अभूतपूर्व यश मिळवले त्याबद्दल संस्थेचे सचिव मा.डॉ.दामोदर काका पतंगे यांनी सांघिक कामगिरीत सर्वप्रथम,द्वितीय आणि तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांचा शाल,श्रीफळ आणि पुष्पगुच्छ ,पुष्पहार देऊन यथोचित सन्मान केला व प्रमाणपत्राचे वाटप केले.वैयक्तिक कलाप्रकारातही श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी अनेक पारितोषिक पटकावले.त्यांचाही शाल ,श्रीफळ आणि स्मृतीचिन्ह देऊन संस्थेचे उपाध्यक्ष प्रभाकर तात्या हिरवे यांनी सत्कार करून त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप टाकली.तब्बल आठ पारितोषिक पटकावत अनुष्का कोकणे, अपूर्वा माने,स्नेहा औरादे , काव्या माळगे, नागेश सूर्यवंशी,रितेश गायकवाड,श्रेयस रेड्डी,अभिषेक कदम,चैतन्य कट्टी,समर्थ कुंभार,ओमकार पाटील,प्रथमेश भिसे,आदित्य कारभारी,सूरज दासमे या विद्यार्थ्यांनी पहिल्यांदाच आपली क्रमवारी राखत सर्वोच्च अशी कामगिरी करत बक्षिसांचा उच्चांक गाठला .तसेच या सबंध प्रक्रियेला सहकार्य करून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविणारे आणि सर्वांच्या कसरतीच्या श्रमाचे मानकरी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गुलाब राठोड,व्यवस्थापक प्रा.डॉ.आर.एन.निगडे,महिला व्यवस्थापक प्रा.डॉ.एम.जी. आंभुसे,प्रशिक्षक प्रा. गुरप्पा तम्मा शेटगार , मोती जटीथोर यांचाही यथोचित गौरव करून सन्मान करण्यात आला.यापुढेही विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळवून देण्यासाठी महाविद्यालय पूर्णतः कटिबद्ध आहे असे अभिवाचन देऊन प्राचार्यांनी आपल्या मनोगतातून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.नागसेन कांबळे यांनी केले तर प्रा.आर.एन.निगडे यांच्या आभार प्रदर्शनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १८ सप्टेंबर २०२५


## महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा शाळेमध्ये मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन उत्साहात साजरा



**छत्रपती संभाजीनगर** : महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा या शाळेत मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी शालेय समितीचे अध्यक्ष श्री मदन काका नवपुते तसेच शालेय समितीचे उपाध्यक्ष श्री रामेश्वर भाऊ कोरडे यांची उपस्थिती होती. त्याचप्रमाणे शालेय समितीचे सर्व पदाधिकारी व महिला पदाधिकारी हे सुद्धा या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. श्री रामेश्वर भाऊ कोरडे यांनी ध्वजाला श्रीफळ अर्पण केले तसेच शालेय समितीचे अध्यक्ष मदन काका नवपुते यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. शाळेतील विद्यार्थिनी यांनी समूह गान करून काही विद्यार्थ्यांनी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त भाषणे केली. गावातील प्रतिष्ठित माननीय श्री चंदन भाऊ साळवे यांनी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाची माहिती विद्यार्थ्यांना दिली या कार्यक्रमासाठी शालेय समितीचे पदाधिकारी तसेच गावातील प्रतिष्ठित मंडळी भागिनाथ नवपुते, किसन आप्पा नवपुते, संजय कोरडे, चंदन साळवे ( ज्येष्ठ नागरिक ) देवदत्त मगरे, व सोमय्या बाजी यांनी उपस्थिती दर्शविली. शाळेचे मुख्याध्यापक श्री शिंदे सर व शाळेतील सर्व शिक्षक या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांची उपस्थिती खूप छान होती. शालेय समितीचे उपाध्यक्ष माननीय श्री कोरडे साहेब यांनी स्वखर्चाने विद्यार्थ्यांना बिस्कीट पुढे व खाऊ वाटप केले या कार्यक्रमांमध्ये शाळेचे प्रभाकर शिंदे मुख्याध्यापक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. वसंत राठोड, श्रीमती मंगल तारो, श्रीमती बेबी राऊत, सर्जेराव वाघ, भारद्वाज अर्चना, संदीप चव्हाण, मनीषा शिंदे, पठाण जाहेद खान, श्रीमती विद्या सासवडे, संग्राम सिंग राजपूत, अनुजा भिंगोले, सूर्यवंशी चरण सिंग, श्रीमती नीलिमा कवठेकर, श्रीमती अरुणा फुलंब्रीकर सुनिता साबळे व कर्मचारी या कार्यक्रमासाठी उपस्थित होते शाळेतील विद्यार्थ्यांना बिस्कीट पुढे यांचे वाटप करण्यात आले.

## महिला कला महाविद्यालयाच्या इतिहास विभागातर्फे शैक्षणिक सहल

**छत्रपती संभाजीनगर** : डॉ. सौ. इं. भा. पा. महिला कला महाविद्यालयाच्या इतिहासविभागातर्फे मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त दि. १५ सप्टेंबर २०२५ रोजी बी. ए. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनींसाठी शैक्षणिक सहलीचे (Study Tour) 'पितळखोरा लेणी,काली मठ, पाटणा देवी' येथे आयोजन करण्यात आले. या सहलीसाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई यांचे मार्गदर्शन लाभले. या सहलीचे आयोजन इतिहास विभाग प्रमुख डॉ. सुषमा देशपांडे व प्रा. कविश्री देशमुख, प्रा. दत्तू लहाने यांनी केले.

बी.ए. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षातील इतिहास विषयाच्या अभ्यासक्रमात शैक्षणिक सहलीच्या नियोजनाचे महत्व निश्चितच असून या सहलीद्वारे विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभवातून आपल्या अभ्यासक्रमातील घटकांचे अध्ययन केले. विषय रीतीने आकलन होण्यासाठी अशा अभ्यासपूरक उपक्रमांची गरज असते त्यानुसार या सहलीच्या अनुभवाचा विद्यार्थिनींना निश्चितच उपयोग होईल व या उद्दिष्टानेच हा उपक्रम इतिहास विभागाने आयोजित केला.

याप्रसंगी इतिहास विभाग प्रमुख डॉ. सुषमा देशपांडे यांनी विद्यार्थिनींना पितळखोरा लेण्यांविषयी माहिती सांगितली. या लेण्या इ. स. पूर्व दुसऱ्या शतकातील असून यात एकूण १४ बौद्ध लेण्याचा समावेश आहे, या लेण्या हीनयान काळतील आहेत परंतु चित्रे महायान काळतील आहेत. अभ्यासक्रमात समाविष्ट असलेलेल्या विविध वर्णनात्मक घटकांचा पुन: प्रत्यय याद्वारे विद्यार्थिनींना दिला तसेच संपूर्ण लेण्या व परिसर इ. विषयी माहिती दिली.

बी.ए. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनींनी या सहलीविषयीचे आपले अनुभव सांगताना या शैक्षणिक सहलीचा त्यांच्या अभ्यासासाठी निश्चितच फायदा झाल्याचे सांगितले.

एक शैक्षणिक समृद्ध अनुभवाच्या ठेव्यासह, नैसर्गिक सौंदर्याचा अनुभव घेऊन विद्यार्थीनी घरी परतल्या.

## महानगरपालिका शाळेत मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा



**छत्रपती संभाजीनगर** : मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, मुकुंदवाडी येथे आज दि. १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त ध्वजारोहण कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व पदाधिकारी तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक श्री के. बी. चौधरी यांनी सर्व मान्यवरांचे पुष्प देऊन स्वागत केले. भारताचे पंतप्रधान मा. श्री. नरेंद्रजी मोदी साहेब यांना वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांनी शाळेच्या वतीने शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमात सर्व शिक्षकांनी उत्साहाने सहभाग घेतला.




महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १८ सप्टेंबर २०२५


# आंतरराष्ट्रीय समान वेतन दिनाचे भारतीय संविधानाच्या प्रकाशात समाजशास्त्रीय चिंतन

मानव समाजाच्या इतिहासात असमानता ही जणू अपरिहार्य छाया ठरली आहे. जाती, वंश, धर्म, भाषा अशा विविध आधारांवर भेदभाव अनुभवला गेला; मात्र या सर्वात सर्वाधिक दीर्घकाळ आणि खोलवर ठसलेला भेदभाव म्हणजे स्त्री-पुरुष असमानता होय. मानवी सभ्यता जसजशी प्रगत होत गेली तसतसे 'समता' हे मूल्य केंद्रस्थानी आले. प्राचीन काळातील वंशभेद, जातीभेद, धर्मभेद या अडथळ्यांवर मात करत समाजाने लोकशाही, मानवाधिकार, सामाजिक न्याय अशा संकल्पना रुजवल्या आहेत. मात्र आजही लिंगभावभेदाच्या स्वरूपात असमानता टिकून आहे. स्त्री आणि पुरुष या दोन अर्धांगींनी समाजाची उभारणी झाली असली तरी श्रमाचे मोल ठरवताना स्त्रियांना दुय्यम दर्जा दिला गेला आहे. घरगुती, सामाजिक, आर्थिक, राजकीय अशा सर्वच क्षेत्रांत स्त्रियांना दुय्यम स्थान देण्यात आले. कालांतराने शिक्षण, लोकशाही मूल्ये, स्त्रीवादी चळवळी यामुळे परिस्थितीत बदल घडू लागला आहे. तरीदेखील समानतेच्या लढाईत 'समान कामासाठी समान वेतन' हा प्रश्न आजही निकाली लागलेला नाही. स्त्री-पुरुष दोघेही सारखे श्रम करत असले, समान जबाबदाऱ्या पार पाडत असले, तरीही वेतनाच्या बाबतीत स्त्रियांना कमी मोबदला मिळत असतो. समान कामासाठी समान वेतन हा केवळ आर्थिक मुद्दा नाही; तर तो सामाजिक न्याय, मानवी प्रतिष्ठा आणि लोकशाही तत्त्वांचा गाभा आहे. या वास्तवाची जाणीव करून देण्यासाठी दरवर्षी १८ सप्टेंबर रोजी 'आंतरराष्ट्रीय समान वेतन दिन' साजरा केला जातो. हा दिवस म्हणजे स्त्रियांच्या हक्कांची, मानवी मूल्यांची आणि घटनात्मक तत्त्वांची आठवण करून देणारा एक जागतिक उपक्रम आहे. हा दिवस केवळ एक औपचारिकता नसून सामाजिक न्यायाच्या प्रवासात आत्मपरीक्षणाचा क्षण आहे.

भारतीय संविधान हे जगातील सर्वाधिक प्रगत लोकशाही दस्तावेजांपैकी एक मानले जाते. त्यात समतेच्या तत्त्वाला केंद्रस्थानी ठेवले आहे. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला कायद्यापुढे समानता दिली आहे. भारतीय संविधानातील अनुच्छेद १४ मध्ये 'समानतेचा अधिकार' स्पष्टपणे नमूद केलेला असून भारतीय संविधानातील अनुच्छेद १५ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान यांच्या आधारावर भेदभावास बंदी घालतो तर अनुच्छेद १६ सार्वजनिक सेवांमध्ये किंवा नोकरीत समान संधीचे आश्वासन देतो. तसेच भारतीय संविधानातील अनुच्छेद ३९(घ) राज्याच्या धोरणनिर्देशक तत्त्वांमध्ये स्पष्टपणे नमूद करतो की पुरुष व स्त्रियांना समान कामासाठी समान वेतन दिले जावे तर अनुच्छेद ४२ कामगारांच्या मानवीय हक्कांचे रक्षण करण्याचे बंधन घालतो. संविधानातील या तरतुदींमधून घटनाकारांनी स्त्रियांच्या आर्थिक हक्कांचा विचार किती गांभीर्याने केला होता हे स्पष्ट होते. या तरतुदींमधूनच हे स्पष्ट होते की समता ही आपल्या लोकशाहीचा पाया आहे. मात्र या हमींचे प्रत्यक्षातले चित्र पाहिले तर असमानता अनेक स्तरांवर पसरलेली असून घटनात्मक आश्वासन आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यामध्ये मोठी दरी आहे.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विचार केल्यास समान वेतनाचा प्रश्न हा केवळ कायदेशीर तरतुदींचा किंवा कामगार धोरणांचा नाही, तर तो सत्ता-संरचनेशी जोडलेला आहे. शतकानुशतकं पितृसत्ताक समाजव्यवस्थेमध्ये स्त्रियांना घरगुती जबाबदाऱ्यांपुरते मर्यादित केले गेले आहे. बालसंगोपन, घरकाम, वृद्धांची देखभाल या कामांना आर्थिक मूल्यच दिले गेले नाही. त्यामुळे स्त्रीच्या श्रमाचे अवमूल्यन झाले आहे. ही मानसिकता आजही कायम आहे. स्त्रिया कामाच्या ठिकाणी गेल्या तरी त्यांचे योगदान दुय्यम मानले जाते. परिणामी स्त्रियांच्या श्रमांना 'अदृश्य काम' अशी ओळख मिळाली. त्या घराबाहेर कामासाठी गेल्या तरी त्यांचे योगदान दुय्यम मानले गेले. यामुळेच ग्रामीण भागातील शेतमजुरी असो किंवा शहरी भागातील कॉर्पोरेट क्षेत्रातील नोकरी असो, सर्व स्तरांवर स्त्रियांना कमी वेतन दिले जाते.

भारतातील ग्रामीण आणि आदिवासी क्षेत्रात स्त्रिया वीटभट्टी, बांधकाम, शेतमजुरी, मोलमजुरी, घरकाम या क्षेत्रांत काम करतात. त्यांना पुरुषांच्या तुलनेत कमी मजुरी मिळते. शहरी भागातील शिक्षण घेतलेल्या स्त्रिया उद्योगधंद्यात, प्रशासनात, आयटी कंपन्यांत कार्यरत आहेत; तरीही त्यांचे वेतन पुरुषांच्या तुलनेत कमी असते. या विषमतेला 'जेंडर पे गॅप' असे म्हणतात. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या अहवालानुसार भारतातील स्त्रियांना पुरुषांच्या तुलनेत सरासरी २७ टक्क्यांनी कमी वेतन मिळते. असंघटित क्षेत्रात ही दरी आणखी मोठी आहे. जागतिक संदर्भात पाहिले तरी परिस्थिती फारशी वेगळी नसून हा प्रश्न गंभीर आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या 'यूएन विमेन' अहवालानुसार जगभरातील स्त्रियांना पुरुषांच्या तुलनेत सरासरी २० टक्के कमी वेतन मिळते. काही प्रगत देशांनी यावर मात करण्यासाठी कठोर उपाययोजना केल्या आहेत. आइसलँडने २०१८ पासून प्रत्येक कंपनीला समान वेतनाचे प्रमाणपत्र घेणे बंधनकारक केले आहे. स्वीडन, नॉर्वे, फिनलंड यांसारख्या देशांत वेतन संरचना पारदर्शक ठेवली जाते. त्याच्या तुलनेत भारतात १९७६ मध्ये 'समान वेतन कायदा' करण्यात आला तसेच २०१९ मध्ये 'वेतन संहिता' लागू करण्यात आली. पण अंमलबजावणीच्या बाबतीत मर्यादा आहेत. तपासणी यंत्रणा कमी, महिलांच्या हक्कांविषयी जागरूकतेचा अभाव आणि असंघटित क्षेत्राची व्याप्ती मोठी असल्यामुळे कायद्यांचा परिणाम अपेक्षेइतका झाला नाही.

भारतीय न्यायव्यवस्थेने मात्र 'समान कामासाठी समान वेतन' हा घटनात्मक तत्त्वांचा भाग असल्याचे ठामपणे मांडले आहे. रणधीर सिंग विरुद्ध भारत संघ (१९८२) या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की लिंगाच्या आधारावर वेतनात भेदभाव करणे हा घटनात्मक अधिकारांचा भंग आहे. इतर अनेक खटल्यांतही न्यायालयांनी स्त्रियांना समान वेतनाचा अधिकार दिला. पण प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी अद्यापही अदृश्य अडथळे दिसून येतात. स्त्रियांना एका विशिष्ट पातळीपलीकडे बढती मिळत नाही, निर्णयक्षम पदांवर त्यांना पोहोचता येत नाही. हे आर्थिक आणि सामाजिक दोन्ही स्तरांवर अन्यायकारक असून त्यामुळे आर्थिक व सामाजिक सत्तेतील असमानता अधिक गडद होते.

समान वेतनाची अंमलबजावणी केल्यास त्याचे परिणाम केवळ स्त्रियांसाठीच नव्हे तर संपूर्ण समाजासाठी सकारात्मक होतात. महिलांना योग्य मोबदला मिळाल्यास त्यांची आर्थिक स्थिती मजबूत होऊन कुटुंब आर्थिकदृष्ट्या सक्षम होते. घरगुती निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढतो. मुलांच्या शिक्षणावर, आरोग्यावर अधिक खर्च होतो. लवकर लग्न, हुंडा यांसारख्या प्रथा कमी होतात. मुलींचे शिक्षण वाढते आणि पुढील पिढ्या सबलीकरणाच्या दिशेने वाटचाल करतात. आर्थिकदृष्ट्या सक्षम महिला समाजातील लोकशाही प्रक्रियेतही सक्रियपणे सहभागी होतात. त्यामुळे समान वेतन हा मुद्दा राष्ट्राच्या एकूण विकासाशी निगडित असून त्यामुळे राष्ट्राच्या विकासाला गती मिळते.

समाजशास्त्र सांगते की असमानतेविरुद्धची लढाई केवळ कायद्यांनी जिंकता येत नाही तर त्यासाठी प्रथम मानसिकता बदलणे गरजेचे आहे. समाजशास्त्राच्या दृष्टीने या समस्येचे निराकरण करण्यासाठी बहुआयामी उपायांची गरज आहे. शाळा-महाविद्यालयांमध्ये लिंगभाव समानतेचे मूल्य शिकवले गेले पाहिजे. माध्यमांनी स्त्रियांची प्रतिमा आदरपूर्वक आणि वास्तवदर्शी मांडली किंवा दाखवली पाहिजे. नियोक्त्यांनी वेतन संरचना पारदर्शक ठेवली पाहिजे. सरकारने वेतन संहितेची कठोर अंमलबजावणी केली पाहिजे. असंघटित क्षेत्रातील कामगारांना किमान वेतनाची हमी देण्यासाठी सक्षम यंत्रणा उभारली पाहिजे. तसेच महिलांनी संघटित होऊन आपले हक्क मागितले पाहिजेत.

भारतीय संविधान हा आपल्या लोकशाहीचा कणा आहे. समता ही त्याची आत्मा असून 'समता' हे मूल्य घराघरात पोहोचले पाहिजे. स्त्री-पुरुष समानतेशिवाय लोकशाही अपूर्ण आहे. आंतरराष्ट्रीय समान वेतन दिन आपल्याला याचीच जाणीव करून देतो. आज भारत डिजिटल इंडिया, आत्मनिर्भर भारत, स्टार्टअप इंडिया यांसारख्या मोहिमा राबवतो आहे. पण या योजनांचा खरा यशस्वी परिणाम घडवायचा असेल तर स्त्रियांचा सक्रिय सहभाग आणि त्यांना न्याय्य मोबदला मिळणे अपरिहार्य आहे. समान वेतनाशिवाय विकास केवळ अर्धवट ठरेल.

शेवटी एवढेच म्हणता येईल की, समान वेतन हा आर्थिक मुद्दा नसून सामाजिक न्याय, मानवी प्रतिष्ठा आणि घटनात्मक समतेचा प्रश्न आहे. आंतरराष्ट्रीय समान वेतन दिन हा स्त्री-पुरुष समतेच्या प्रवासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. तो आपल्याला स्मरण करून देतो की खरी लोकशाही आणि खरी प्रगती तेव्हाच साध्य होईल जेव्हा स्त्री-पुरुषांना समान श्रमासाठी समान मोबदला मिळेल. ही जबाबदारी केवळ सरकारची किंवा न्यायालयांची नसून संपूर्ण समाजाची आहे. स्त्री-पुरुष समतेचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रत्येकाला आपला वाटा उचलावा लागेल.




**डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**मो. क्र. ९९६०१०३५८२,**
bagate.rajendra5@gmail.com



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002